शनिवार
१४
मार्च २०२६

वर्ष १९ वे
अंक - ६४
पाने - ०६
किंमत - ०४ रूपये

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com


# दैनिक युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

संपादिका : सौ. सुशीला किसन हासे (बी. ए.)
संस्थापक : किसन भाऊ हासे (बी. जे.)
कार्यकारी संपादक : सुदीप किसन हासे (एम.ई.)

RNI No. MAHMAR/2007/24252
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

होळीच्या सर्व वाचकांना हार्दिक शुभेच्छा !







दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
RNI No. MAHMAR/2007/24252
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25






# इस्त्रायल- इराण युद्धादरम्यान अमेरिकेला जबर धक्का

## अमेरिकन लष्करी विमान कोसळले



अमेरिका, इस्त्रायल आणि इराणमध्ये गेल्या अनेक दिवसांपासून भयंकर युद्ध सुरूच आहे. युद्धात तेहरानसह अनेक इराणी शहरे उध्वस्त झाली आहेत. तर या युद्धात मृतकांचा आकडा हजारोंच्या घरात गेला आहे. अशातच आता इराकमध्ये अमेरिकन सैन्याचे इंधन भरणारे विमान कोसळल्याची माहिती आहे. इराकमध्ये सुरू असलेल्या युद्धादरम्यान त्यांचे केसी-१३५ इंधन भरणारे विमान कोसळल्याचे अमेरिकेच्या सेंट्रल कमांडने सांगितले घटनेनंतर तात्काळ बचाव मोहीम सुरू करण्यात आली. या घटनेत दोन विमानांचा सहभाग असून एक विमान पश्चिम इराकमध्ये कोसळले, तर दुसरे सुरक्षितपणे उतरल्याची माहिती आहे. अमेरिकन सैन्याने सांगितले की, दोन विमाने यात सहभागी होती. एक विमान सुरक्षितपणे उतरले, तर दुसरे क्रॅश झाले. लष्कराने म्हटले की हा अपघात शत्रूच्या गोळीबारामुळे किंवा मैत्रीपूर्ण गोळीबारामुळे झाला नाही. सध्या बचाव मोहीम सुरू आहे आणि तपास सुरू आहे. इराणला लक्ष्य करणाऱ्या अमेरिकन लष्करी कारवाईचा एक भाग या घटनेबाबत बोलताना सांगण्यात आले कि, एपिक फ्युरी ऑपरेशन दरम्यान मैत्रीपूर्ण हवाई क्षेत्रात हि घटना घडली आणि सध्या बचाव मोहीम सुरू आहे. ही कारवाई इराणला लक्ष्य करणाऱ्या अमेरिकन लष्करी कारवाईचा एक भाग आहे. हे केसी-१३५ विमान लांब पल्ल्याच्या मोहिमांमध्ये लढाऊ विमाने आणि इतर लष्करी विमानांना हवेत इंधन भरण्यासाठी वापरले जात असे. अलिकडच्या काळात, अमेरिकेने इस्त्रायलसह मध्य पूर्वेत इराणविरुद्ध मोठ्या प्रमाणात विमाने तैनात केली आहेत. ही कारवाई २८ फेब्रुवारी रोजी सुरू झाली जेव्हा अमेरिका आणि इस्त्रायली सैन्याने इराणी लक्ष्यांवर हल्ला केला. त्यानंतर युद्ध व्यापक प्रादेशिक लष्करी कारवाईत रूपांतरित झाले. हा विमान अपघात अशा वेळी झाला जेव्हा संघर्षात मृतांची संख्या सातत्याने वाढत आहे. हल्ले सुरू झाल्यापासून सात अमेरिकन सैनिकांचा मृत्यू झाला आहे. इराणविरुद्ध अमेरिका-इस्त्रायली युद्धात जवळपास १५० अमेरिकन सैनिक जखमी झाले आहेत. अमेरिकन लष्करी विमान अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. किंबहुना, एका अधिकाऱ्यांनी सांगितले आहे की हा अपघात हवाई क्षेत्रात गोळीबारामुळे झाला नाही

### युद्ध थांबवण्यासाठी इराणच्या तीन अटी

**इराण आणि अमेरिका यांच्या युद्धाचा आज १४ वा दिवस आहे. या युद्धामुळे पूर्ण जग संकटात आले. डोनाल्ड ट्रम्प यांनी थेट म्हटले की, आम्ही विजयाच्या अत्यंत जवळ आहोत, इराणकडे ताकद शिल्लक राहिली नाही. मात्र, इराणकडून हे युद्ध सुरू राहणार असल्याचे संकेत आहेत. यासोबतच युद्ध थांबवायचे असेल तर तीन प्रमुख अटी इराणकडून घालण्यात आल्या या अटी अमेरिकेने मान्य केल्या तरच युद्ध थांबणार असल्याचे मोठे इराणकडून सांगण्यात आले. इराणसोबतचे युद्ध इतके जास्त कठीण असेल असे अमेरिकेला एक टक्काही वाढले नव्हते. यादरम्यानच इराणकडून थेट डोनाल्ड ट्रम्प यांना वारंवार धमक्या दिल्या जात आहेत. आता पुन्हा एकदा डोनाल्ड ट्रम्प यांच्या दुखत्या नसवर हात ठेवत इराणकडून मोठे भाष्य करण्यात आले. इराणकडून थेट धमकीही देण्यात आली. फक्त ट्विट करून युद्ध लढता येत नसल्याचे इराणने म्हटले. इराणचे उच्च अधिकारी अली लाजीजानी यांनी सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत म्हटले की, ट्रम्प यांना युद्ध सुरू करण्याचे गंभीर परिणाम भोगावे लागणार आहेत.**

# संगमनेरात दुचाकी चोरीचे सत्र सुरूच

## सुयोग कॉलनीतून महागडी रॉयल एनफिल्ड लंपास




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शहरातील दुचाकी चोरीच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असून गुरुवारी सुयोग कॉलनी परिसरात आणखी एक धाडसी चोरीची घटना घडली. सुयोग कॉलनी येथील रहिवासी मिलिंद पलोड यांची घराबाहेर उभी असलेली महागडी Royal Enfield दुचाकी क्र. एमएच १७ डीई ७९७९ अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना गुरुवार दि. १२ मार्च २०२६ रोजी दुपारी सुमारे २.३० वाजण्याच्या सुमारास घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, चोरीपूर्वी दोन अज्ञात इसम दुचाकीवर येऊन परिसरात संशयास्पदरीत्या फिरताना दिसले. त्यांनी आधी परिसराची रेकी केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. त्यानंतर काही वेळातच मिलिंद पलोड यांच्या घराबाहेर उभी असलेली महागडी दुचाकी चोरट्यांनी क्षणात लंपास केली.

दरम्यान, रेकी करणारे दोघे संशयित परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले असून त्याचे फुटेज स्थानिकांच्या हाती लागले आहे. या आधारे पोलिसांकडून पुढील तपास सुरू असल्याची माहिती मिळत आहे. गेल्या काही महिन्यांपासून संगमनेर शहरात दुचाकी चोरीच्या घटना वाढताना दिसत आहेत. शहरातील विविध भागांतून अनेक वाहने चोरीला गेल्याच्या तक्रारी समोर आल्या असल्या तरी त्यापैकी अनेक प्रकरणांचा अद्यापही उलगडा झालेला नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांच्या तपासावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. दरम्यान, वाढत्या चोरीच्या घटनांमुळे नागरिकांनी आपल्या वाहनांच्या सुरक्षेबाबत अधिक दक्षता घेण्याची गरज व्यक्त केली जात आहे. तसेच शहरातील दुचाकी चोरीच्या मालिकेचा लवकरात लवकर छडा लावून आरोपींना अटक करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

# संगमनेर जिल्हा निर्मितीचा प्रस्ताव तातडीने समितीसमोर ठेवा – आ. खताळ

## अवैध गौण खनिज उत्खननावरती कडक कारवाईची मागणी




**संगमनेर तालुक्यातील १६ तलाठी कार्यालये आणि ३ मंडल अधिकारी कार्यालयांच्या इमारतींसाठी तसेच भूमी अभिलेख कार्यालयाच्या इमारतीवर अतिरिक्त मजला बांधण्यासाठी राज्याच्या अर्थसंकल्पात निधीची तरतूद करण्यात यावी अशी मागणी आमदार अमोल खताळ यांनी विधिमंडळात सरकारकडे केली.**

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - अहिल्यानगर जिल्ह्याचे विभाजन करून संगमनेर जिल्ह्याची निर्मिती करण्याचा प्रस्ताव तातडीने विशेष समितीसमोर ठेवून त्यावर लवकर निर्णय घ्यावा अशी मागणी आमदार अमोल खताळ यांनी विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात केली. यासोबतच संगमनेर तालुक्यात सुरू असलेल्या अवैध गौणखनिज उत्खननावर कडक कारवाई करावी तसेच तलाठी, मंडल अधिकारी आणि भूमी अभिलेख कार्यालयांच्या इमारतींवर अतिरिक्त मजले बांधण्यासाठी अर्थसंकल्पात निधीची तरतूद करावी, अशी मागणीही त्यांनी शासनाकडे केली.

अहिल्यानगर जिल्ह्याचे विभाजन करून संगमनेर जिल्हा करण्याची मागणी गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने केली जात आहे. या मागणीसाठी अनेकवेळा आंदोलने सुद्धा करण्यात आले आहे. सन २०१८ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत या विषयावर सकारात्मक चर्चा झाली होती. मात्र त्यानंतरही जिल्हा विभाजनाचा प्रश्न अद्याप प्रलंबित आहे. त्यामुळे राज्य शासनाने संगमनेर जिल्हा निर्मिती संदर्भातील प्रस्ताव तातडीने विशेष समितीसमोर ठेवून त्यावर लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घ्यावा. अशी मागणी आ. खताळ यांनी विधिमंडळात करत या प्रमुख प्रश्ना कडे सरकारचे लक्ष वेधले. संगमनेर तालुक्यात अनेक वर्षांपासून अवैध गौणखनिज उत्खनन मोठ्या प्रमाणात सुरू असल्याचा मुद्दाही आ. खताळ यांनी विधान सभेत उपस्थित केला. प्रशासनाकडून गौणखनिजाची वाहतूक करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केली असल्याचे कागदोपत्री दाखवले जात असले तरी प्रत्यक्षात अनेक कारवाया केवळ कागदावरच राहिले असल्याचे त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. अनेक कारवायांमध्ये दंड (पान ४)

# गॅस दरवाढी विरोधात संगमनेरात काँग्रेसचे आंदोलन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - देशामध्ये निर्माण झालेल्या भीषण गॅस टंचाई व दरवाढी विरोधात काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर तालुका काँग्रेसच्यावतीने भव्य निदर्शने करत आंदोलने करण्यात आली. याचबरोबर केंद्र सरकारने सर्वसामान्य जनतेला दिलासा देण्याबाबत गॅस उपलब्धता करून तातडीने दरवाढ कमी करावी अशी आग्रही मागणी युवक काँग्रेसच्या अध्यक्षा डॉ जयश्रीताई थोरात यांनी केली.

प्रांताधिकारी कार्यालय येथे संगमनेर शहर व तालुका काँग्रेसच्यावतीने गॅस दरवाढी विरोधात भव्य निदर्शन करण्यात आले यावेळी युवक काँग्रेसच्या अध्यक्षा डॉ. जयश्रीताई थोरात, तालुकाध्यक्ष अजय फटांगरे, नवनाथ आरगडे, प्रमिला अभंग, पद्माताई थोरात, राजू खरात, शिवाजी जगताप, बाबासाहेब गायकर, विलास वर्पे, भास्कर शरमाळे, योगिता सातपुते, तात्याराम कुटे, शिवाजी खुळे, प्रवीण गायकवाड, नानासाहेब शिंदे, विजय पवार, विद्यार्थी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष शेखर सोसे, राजू गुंजाळ, विद्यार्थी काँग्रेस राज्य सरचिटणीस हरी ओम पवार, यांच्यासह विविध कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सध्या राज्यामध्ये महागाई व गॅस टंचाई निर्माण झाली आहे. यामुळे गॅसचे भाव गगनाला भिडले आहे. गॅस मिळत नाही. सर्वसामान्य नागरिक त्रस्त झाला आहे. अनेक महाविद्यालयांमधून असणाऱ्या होस्टेलमध्ये विद्यार्थ्यांच्या जेवणाचा प्रश्न निर्माण झाला आहे. केंद्र सरकार हे फक्त घोषणाबाजी करत असून अमेरिकेपुढे दबले आहे. केंद्र सरकार विरोधात जनतेचा मोठा आक्रोश आहे. गॅस दरवाढ कमी करावी म्हणून काँग्रेसच्यावतीने संगमनेरमध्ये तीव्र आंदोलन करण्यात आले असून केंद्र सरकारच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली.

यावेळी बोलताना डॉ जयश्रीताई थोरात म्हणाल्या की, गॅस दरवाढीचा फटका हा सर्वसामान्य कुटुंबाला बसला आहे. गॅस मिळत नाही. रांगाच्या रांगा लागल्या आहेत. अमेरिका आणि आखाती देशांमधील युद्धाचे कारण अजून कुणालाही माहित नाही. यामुळे गॅस दरवाढ झाली असून महिलांमध्ये मोठी प्रचंड नाराजी आहे. काँग्रेस सरकारच्या काळामध्ये अवघ्या साडेतीनशे रुपयाला गॅस सिलेंडर मिळत होता मात्र आता त्याची किंमत हजार रुपये झाली आहे. हेच का अच्छे दिन असा सवाल करताना (पान ४ वर)







# महाराष्ट्रावर अवकाळी संकटाचा इशारा



पुणे (प्रतिनिधी)

महाराष्ट्रातील हवामानात पुढील काही दिवस मोठे बदल होण्याची शक्यता असून राज्यातील अनेक जिल्ह्यांसाठी धोक्याचा इशारा देण्यात आला आहे. कृषी विभागाने दिलेल्या प्राथमिक अंदाजानुसार १७, १८, १९ आणि २० मार्च या कालावधीत राज्यातील काही भागांमध्ये अवकाळी पाऊस, मेघगर्जना, विजांचा कडकडाट, वादळी वारे तसेच काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे १२ पेक्षा अधिक जिल्ह्यांमध्ये हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे.

मार्च महिना सुरू झाला असला तरी अवकाळी पावसाचे सत्र थांबण्याची चिन्हे दिसत नाहीत. हवामान विभागाच्या अंदाजानुसार या काळात प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा, खानदेश तसेच मध्य महाराष्ट्रातील काही भागांमध्ये दुपारनंतर ढगाळ वातावरण तयार होऊन मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे. यासोबतच जोरदार वादळी वारे वाहण्याची शक्यता असून काही ठिकाणी गारपीटही होऊ शकते. विशेषतः १८ ते २० मार्च दरम्यान हवामानातील घडामोडी अधिक तीव्र होण्याची शक्यता असल्याने प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला आहे. (पान ४ वर)

# सुकेवाडी–खांजापूर येथे श्री कानिफनाथ महाराजांच्या यात्रेला उत्साहात सुरुवात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -तालुक्यातील सुकेवाडी-खांजापूर येथे महाराष्ट्रातील नवकानिफ सिद्धपीठांपैकी सातवे नाथ सिद्धपीठ मानल्या जाणाऱ्या श्री कान्होबा उर्फ कानिफनाथ महाराजांची जंगी यात्रा गुरुवार, दि. १२ मार्च २०२६ रोजी मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात सुरू झाली. अनेक वर्षांपासून पारंपरिक पद्धतीने साजरी होणारी ही यात्रा परिसरातील भाविकांसाठी श्रद्धा व भक्तीचे प्रमुख केंद्र मानली जाते. दोन दिवस चाललेल्या या यात्रेनिमित्त विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल पहायला मिळाली. पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली.

यात्रेनिमित्त सकाळी ८ ते ११ वाजेपर्यंत होमहवन, सायंकाळी छबिना मिरवणूक, ढोल - ताशांच्या गजरात आरती व शोभेची दारू उडविण्यात आली. सायंकाळी ७.३० वाजता महाआरती त्यानंतर रात्री रंगतदार लोकनाट्य तमाशा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कलाकारांचा तमाशा रसिकांना पाहायला मिळाला. शुक्रवार, दि. १३ मार्च रोजी सकाळी हजेरी कार्यक्रम पार पडला तर शनिवार, दि. १४ मार्च रोजी दुपारी बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात आले आहे.

पूर्वीपासून येथे धर्मनाथ बीजोत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा करण्याची परंपरा असून अनेक वर्षांपासून भाविक मोठ्या श्रद्धेने या उत्सवात सहभागी होत आहेत. पहाटे श्रींचे मंगल स्नान, काकड आरती, शाबरी मंत्रांचे हवन, महाभिषेक तसेच सायंकाळी श्रींची मिरवणूक, महाआरती, भजन संध्या आणि भव्य महाप्रसादाचा कार्यक्रम पार पडतो. याच दिवशी आयोजित भव्य रक्तदान शिबिरालाही दरवर्षी भाविकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असतो.

दरवर्षीप्रमाणे श्री क्षेत्र सुकेवाडी-खांजापूर ते श्री क्षेत्र मढी येथे काठी देवाची पायी दिंडी सोहळाही श्रद्धेने पार पडला असून या सर्व धार्मिक परंपरांमुळे सुकेवाडी परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

श्री क्षेत्र मढी यात्रेनिमित्त काढण्यात येणाऱ्या पायी दिंडी सोहळा व ज्योत नियोजनासाठी गोरख शंकर रसाळ, अशोक महादू खर्डे, आकाश शशिकांत सातपुते, बबन बाळाजी कुटे, अन्नासाहेब रघुनाथ सातपुते, पाराजी बबन खिलारी, संजय शंकर कुटे, अक्षय देविदास शेटे व तेजस दगडू कांदळकर आदीं भक्तांगणांनी विशेष परिश्रम घेतले.

# विजेच्या गलथान कारभार विरोधात काँग्रेसचे ठिय्या आंदोलन

## पाणी पुरवठा योजनांचे तोडलेले वीज कनेक्शन सुरू करा - डॉ. जयश्रीताई थोरात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - राज्यभरात उन्हाची तीव्रता वाढली आहे. पिकांना पाण्याची गरज आहे. अशा वेळी शेतकऱ्यांना अत्यंत कमी दाबाने व अवेळी वीज मिळत आहे. शालेय विद्यार्थ्यांचा परीक्षांचा काळ सुरू आहे. अनेक ठिकाणी वीज पुरवठा बंद होत आहे. भर उन्हाळ्यामध्ये ग्रामपंचायतींसाठी असलेल्या पाणीपुरवठा योजनांचे वीज कनेक्शन कट केल्याने अनेक नागरिकांचे पिण्याच्या पाण्याचे हाल होत आहे. या सर्व गलथान कारभार विरोधात डॉ. जयश्रीताई थोरात यांच्या नेतृत्वात काँग्रेसच्यावतीने वीज कार्यालयात आंदोलन करण्यात आले.

वीज वितरण विभागाच्या कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयात संगमनेर काँग्रेसच्या वतीने ठिय्या आंदोलन करण्यात आले. यावेळी युवक काँग्रेस अध्यक्ष डॉ.जयश्रीताई थोरात, अजय फटांगरे, नवनाथ आरगडे, पद्माताई थोरात, प्रमिला अभंग, योगिता सातपुते, प्रदीप हासे, राजू खरात, प्रवीण गायकवाड, बाळासाहेब वाळके, श्रीमती रोहिणीताई गुंजाळ, नानासाहेब दिघे, किरण खुळे, सचिन गोरडे, तात्या कुटे, भास्कर शेरमाळे, राजू गुंजाळ, दिगंबर इंगळे, भाऊसाहेब दिघे, प्रा. सत्यजित थोरात, शेखर सोसे, शिवाजी गुंजाळ, दत्तात्रय खुळे, संजय कुटे, योगेश पोकळे यांच्यासह सुमारे कार्यकर्ते उपस्थित होते.

संगमनेर शहर व तालुक्यामध्ये वीजपुरवठा होत नाही. याचबरोबर वीजपुरवठा वारंवार खंडित होत असून अनेक ठिकाणी अडचणी निर्माण झाले आहेत. शालेय विद्यार्थ्यांच्या परीक्षा सुरू असून त्यांनाही अभ्यासाकरता वीज उपलब्ध होत नाही. गावोगाव पाणीपुरवठा योजनांची वीज कनेक्शन तोडल्यामुळे प्यायला पाणी मिळत नाही. या गलथान कारभाराविरोधात युवक काँग्रेसने ठिय्या आंदोलन केले.

यावेळी बोलताना डॉ. जयश्रीताई थोरात म्हणाल्या की, सध्या राज्यभरात उष्णतेची लाट निर्माण झाली आहे. पिण्याच्या पाण्याची गरज वाढली आहे. अनेक गावांमध्ये ग्रामपंचायत. नागरिकांना सुविधा देणेही प्रशासनाची जबाबदारी आहे. अशी परिस्थिती असताना सरकारने मात्र गावोगावी असलेल्या पाणीपुरवठा योजनांची लाईट बंद केली आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्यासाठी भर उन्हाळ्यात महिलांचे मोठे हाल होत आहे. एकीकडे विद्यार्थ्यांच्या परीक्षा सुरू आहेत. शहरांमध्ये अनेक पेशंट दवाखान्यांमध्ये ॲडमिट असतात. शहर व तालुक्यामध्ये अत्यंत कमी दाबाने लाईट पुरवठा केला जात आहे. शेतकऱ्यांना वेळेवर लाईट मिळत नाही. या ढिसाळ कारभारामुळे शेतकरी विद्यार्थी व महिला त्रस्त झाले आहेत. गुंजाळवाडी, वडगाव पान,समनापुर, खांडगाव यांसह विविध गावांमधील पाणीपुरवठा योजनांची वीज कट झाल्याने पाणीपुरवठा योजना बंद झाल्या आहेत त्यामुळे भर उन्हाळ्यात पाण्यासाठी महिला व नागरिकांना मोठा त्रास होत आहे.

एका बाजूला मोठमोठे भांडवलदार, कंपनी मालक उद्योजक यांना वीज बिल माफ केले जाते. मात्र शेतकऱ्यांना आणि पाणीपुरवठा योजनांना कोणतीही सवलत दिली जात नाही हा कोणता न्याय आहे.

तरी महावितरण विभागाने वीज वितरणासाठी प्राधान्यक्रम ठरवला पाहिजे पिण्याचे पाणी, जनावरांसाठी पाणी ,शालेय विद्यार्थ्यांचा अभ्यास, दवाखाने या सर्व गोष्टींचा अभ्यास करून नियमित व वेळेत वीज पुरवठा करावा व याबाबतचे वेळापत्रक तयार करून सर्व शेतकरी नागरिक व तालुक्यातील जनता यांना याबाबत जागृत करावे व दिलेल्या वेळेत पूर्ण दाबाने व सुरळीत वीज पुरवठा करावा अशी आग्रही मागणी त्यांनी केली.

# जिल्ह्यात शनिवारी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर

## सर्वसामान्य जनतेच्या महसुली समस्यांचे एकाच छताखाली निराकरण

**जिल्हा माहिती कार्यालयाकडून -**

**संगमनेर -** महसूल प्रशासनाला अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्यासाठी तसेच सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, महिला व विद्यार्थ्यांच्या महसूल विषयक तक्रारी व प्रलंबित प्रकरणे तात्काळ निकाली काढण्यासाठी शासनातर्फे 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा-१' राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत शनिवारी, १४ मार्च २०२६ रोजी मंडळ स्तरावर विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले आहे.

येत्या १४ मार्च रोजी ही विशेष शिबिरे जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील निश्चित केलेल्या महसूल मंडळ स्तरांवर पार पडणार आहेत. यामध्ये अहिल्यानगर तालुक्यातील नागापूर, नेवासा मधील भानसहिवरे, पारनेर मधील पळशी, पाथर्डी मधील तिसगाव, शेवगाव मधील ढोरजळगाव शे., कर्जत मधील कुळधरण व भांबोरा, जामखेड मधील खर्डा, संगमनेर मधील घुलेवाडी, अकोले मधील समशेरपूर, श्रीरामपूर मधील बेलापूर, राहुरी मधील बारागाव नांदूर व सात्रळ, राहाता मधील अस्तगाव व कोपरगाव तालुक्यातील रवंदे या महसूल मंडळांचा समावेश आहे.

या शिबिरांच्या माध्यमातून नागरिकांना शासनाच्या विविध सेवा व सुविधा एकाच छताखाली उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. मार्च ते मे या कालावधीत संपूर्ण जिल्ह्यात या अभियानांतर्गत शिबिरे घेतली जाणार आहेत. एप्रिल महिन्यात १० व १७ एप्रिल २०२६ रोजी मंडळ स्तरावर, तर मे महिन्यामध्ये ८ व १५ मे २०२६ रोजी नगरपरिषद व नगरपंचायत पातळीवर शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. या समाधान शिबिरामध्ये एक खिडकी प्रणाली राबविली जाणार असून सर्व महसूल अधिकारी एकाच ठिकाणी उपस्थित राहून नागरिकांना त्वरित सेवा देतील. प्रलंबित फेरफार प्रकरणे निकाली काढणे, सातबारा व आठ-अ उताऱ्यांची दुरुस्ती व तात्काळ उपलब्धता तसेच डिजिटल सातबारा वितरण केले जाईल. महाभूमी पोर्टलवरील डिजिटल सातबाराला आता कायदेशीर वैधता प्राप्त झाल्याबाबत जनजागृती केली जाणार आहे.

विद्यार्थी व नागरिकांना उत्पन्न, रहिवासी, जात व नॉन-क्रीमीलेयर प्रमाणपत्रांचे वितरण तत्काळ केले जाईल. तसेच ई-मोजणी, ई-फेरफार, ग्रीस्टॅक व पीएम किसान संदर्भातील सेवा व सामाजिक अर्थसहाय्य योजनांचे मंजुरी आदेश दिले जातील. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमातील नवीन तरतुदींविषयी नागरिकांना मार्गदर्शन केले जाणार आहे. अंतिम विकास आराखड्यात समाविष्ट असलेल्या जमिनींच्या अकृषक रुपांतरणासाठी आता जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वतंत्र परवानगीची आवश्यकता नाही. तसेच जुनी सनद प्रणाली संपुष्टात आली असून त्याऐवजी एकवेळ अधिमूल्य भरण्याची सोपी व्यवस्था लागू करण्यात आली आहे. या सर्व नवीन बदलांविषयी नागरिकांना सविस्तर माहिती दिली जाईल.

नागरिकांना एकाच दिवसात सेवा पुरविणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात आली असून सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, मंडळ अधिकारी व तलाठी यांनी समन्वय साधून काम करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तरी जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी, शेतकऱ्यांनी व विद्यार्थ्यांनी संबंधित कागदपत्रांसह १४ मार्च रोजी आयोजित या 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरा'त उपस्थित राहून आपल्या महसुली समस्यांचे निराकरण करून घ्यावे, असे आवाहनही श्री.आशिया यांनी केले आहे.

# देशाच्या प्रतिमेला धक्का देऊ नका - उपमुख्यमंत्री शिंदे

मुंबई (वृत्तसंस्था)

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावर आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर भारताची प्रतिमा मलिन केल्याचा आरोप केला. ते म्हणाले की, जागतिक परिस्थिती संवेदनशील असताना आणि देशाला एकजूट राहण्याची गरज असताना, काही नेते परदेशात जाऊन भारताविरुद्ध विधाने करतात.पत्रकारांशी बोलताना, शिंदे यांनी नागरिकांना आश्वासन दिले की भारत सरकार आंतरराष्ट्रीय परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे आणि देशात इंधन किंवा गॅसची कमतरता टाळण्यासाठी आवश्यक पावले उचलत आहे. ते म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी वैयक्तिकरित्या परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत आणि आंतरराष्ट्रीय संघर्षांचा सामान्य नागरिकांवर परिणाम होऊ नये यासाठी केंद्र आणि राज्य सरकार समन्वयाने काम करत आहेत.इंधन आणि गॅसच्या कमतरतेबद्दल पसरणाऱ्या अफवांकडे लक्ष देऊ नका असे आवाहन उपमुख्यमंत्र्यांनी जनतेला केले. त्यांनी सांगितले की अधिकाऱ्यांनी साठा प्रभावीपणे व्यवस्थापित करण्यासाठी स्पष्ट पुरवठा व्यवस्था स्थापित केली आहे. शिंदे यांनी काँग्रेस नेते राहुल गांधींवर निशाणा साधत म्हटले की ते संसदेतही वारंवार परदेश दौऱ्यावर जातात. त्यांनी आरोप केला की लोकशाहीच्या मंदिरात, संसदेत मुद्द्यांवर चर्चा करण्याऐवजी राहुल गांधी परदेशात जाऊन भारताची बदनामी करणे पसंत करतात आणि ही त्यांची सवय बनली आहे.

# मराठी भाषा भवन उभारणार - मंत्री उदय सामंत

मुंबई (वृत्तसंस्था)

मराठी भाषा गौरव दिन निमित्ताने विधानपरिषदेत मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर तिच्या विकासासाठी विविध उपक्रम राबवले जात असल्याची माहिती राज्याचे भाषा मंत्री उदय सामंत यांनी विधानपरिषदेत दिली. याचाच भाग म्हणून मराठी भाषा भवन' उभारण्याचे काम सुरू झाले असून ते देशातील सर्वात आकर्षक भाषा भवनांपैकी एक असेल असे त्यांनी सांगितले.

विधानपरिषदेत प्रश्नोत्तरांच्या तासात भाई जगताप यांनी मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्यानंतर कोणती पाऊले उचलली गेली, असा प्रश्न उपस्थित केला. तसेच मराठी भाषा विभागाने नेमके कोणते उपक्रम राबवले याबाबत प्रश्न उपस्थित केले. या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री उदय सामंत यांनी मराठी भाषेसाठी साठी कोणतेही काम झाले नाही, हा आरोप चुकीचा असल्याचे स्पष्ट केले. मराठीवर हिंदीची सक्ती केली जात असल्याचा आरोपही दिशाभूल करणारा असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी त्यांनी रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखालील माशेलकर समितीचा उल्लेख केला. या समितीने पहिली ते बारावीपर्यंत मराठीसोबत हिंदी अनिवार्य करण्याचा प्रस्ताव मांडला होता आणि त्या काळातील नेतृत्वाने तो स्वीकारल्याचेही त्यांनी नमूद केले. मात्र निवडणुका जवळ आल्यावर विरोधकांनी मराठीऐवजी हिंदी सक्ती होत असल्याचा चुकीचा प्रचार केल्याचा आरोप त्यांनी केला. मराठीच्या जतन व संवर्धनासाठी राज्य सरकार विविध योजना राबवत असल्याचे सांगताना सामंत यांनी मराठी भाषा भवन उभारणीचे काम सुरू झाल्याची माहिती दिली.

# धर्मांतर रोखण्यासाठी सरकारचा नवा कायदा



मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यात जबरदस्तीने किंवा प्रलोभने देऊन केले जाणारे धर्मांतर रोखण्यासाठी राज्य सरकारने तयार केलेले महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक २०२६, आज महाराष्ट्र विधानसभेच्या कामकाजात मांडले जाणार आहे. या विधेयकाला मागील आठवड्यात झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली होती. त्यानंतर आज ते औपचारिकरीत्या विधानसभेत सादर केले जाणार आहे. सरकारच्या मते, राज्यात जबरदस्तीने किंवा आमिष दाखवून धर्मांतर घडवून आणण्याच्या घटना रोखण्यासाठी हा कायदा आवश्यक आहे. दोन्ही सभागृहांची मंजुरी मिळाल्यानंतर हे विधेयक राष्ट्रपतींकडे पाठवले जाईल आणि त्यांची मंजुरी मिळाल्यानंतर हा कायदा राज्यात लागू होणार आहे.

या प्रस्तावित कायद्याच्या मसुद्यानुसार बेकायदेशीर किंवा जबरदस्तीच्या धर्मांतराविरुद्ध कठोर तरतुदी करण्यात आल्या आहेत. कायद्यातील कलम १४ मध्ये अशा प्रकारच्या धर्मांतरात दोषी आढळलेल्या संस्थांवर बंदी घालण्याची तसेच दंडात्मक कारवाई करण्याची तरतूद आहे. तसेच कलम ९ मध्ये गुन्हे आणि त्यासाठीच्या शिक्षांची तरतूद करण्यात आली आहे. या कलमातील उपकलम (४) नुसार जबरदस्तीने किंवा फसवणूक करून धर्मांतर केल्यास दोषींना सात वर्षांपर्यंत कारावासाची शिक्षा आणि पाच लाख रुपयांपर्यंत दंडाची तरतूद प्रस्तावित आहे. त्यामुळे हा कायदा राज्यातील सर्वात कठोर धर्मांतरविरोधी कायद्यांपैकी एक ठरू शकतो.

या कायद्याचा मसुदा तयार करण्यासाठी राज्य सरकारने विशेष समितीही स्थापन केली होती. १४ फेब्रुवारी २०२५ रोजी पोलिस महासंचालकांच्या अध्यक्षतेखाली या समितीची स्थापना करण्यात आली होती. समितीने इतर राज्यांमधील समान कायद्यांचा अभ्यास करून तसेच कायदेशीर बाबींचा सखोल विचार करून या विधेयकाचा मसुदा तयार केला. त्यानंतर मंत्रिमंडळाने या मसुद्याला मंजुरी दिली आणि आता तो विधिमंडळासमोर ठेवला जात आहे. राज्य सरकारचे म्हणणे आहे की, या कायद्यामुळे जबरदस्तीच्या धर्मांतराच्या घटनांवर प्रभावी नियंत्रण ठेवता येईल.

# शेत - शिवार रस्त्यांचे तब्बल ७५ वाद 'बांधावरच' निकाली

**जिल्हा माहिती कार्यालय-**

कोपरगाव तालुक्यातील शेत-शिवार रस्त्यांच्या प्रलंबित केसेसवर तहसीलदार महेश सावंत यांनी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन न्यायनिवाडा करण्याची मोहीम हाती घेतली आहे. यामुळे आतापर्यंत ७५ क्लिष्ट प्रकरणे निकाली निघाली. ६० किमीहून अधिक लांबीचे रस्ते मोकळे झाले आहेत. नुकतेच हिंगणी येथील पारधी वस्तीचा १४ वर्षांपासून प्रलंबित असलेला वाद सामंजस्याने मिटवून या मोहिमेने आपला यशस्वी ७५ वा टप्पा पूर्ण केला आहे. 'बांधावरच न्यायनिवाडा' हा 'कोपरगाव पॅटर्न' आता राज्यात नावारूपाला येत आहे.

कोपरगाव तालुक्यातील ग्रामीण भागात शेतीपूरक व्यवसाय मोठ्या प्रमाणावर केला जातो. मात्र, जमिनीचे विभाजन, खरेदी-



विक्री व कौटुंबिक वाटणीमुळे दरडोई जमीनधारणा कमी होत असून शेतरस्त्यांवरून वारंवार वाद निर्माण होतात. यातून वेळ, श्रम व संसाधनांचा अपव्यय टाळण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार सावंत यांनी हा उपक्रम सुरू केला आहे.

प्रशासनाने या मोहिमेत जुने आणि गुंतागुंतीचे वाद संपुष्टात आणले : ६७ वे प्रकरण : ब्राह्मणगाव टाकळी येथील देवकर वस्तीवरील ५ कुटुंबांचा रस्ता प्रश्न मिटवून २७ व्यक्तींची वहिवाट सुलभ करण्यात आली.

६८ वे प्रकरण : महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम कलम ४९ अन्वये, उक्कडगाव येथील रस्ता व पाइपलाइनचा वाद जागेवरच मिटवून ४ कुटुंबांना दिलासा देण्यात आला. ६९ वे प्रकरण : संवत्सर येथील जाधव वस्तीवर रेल्वे विभाग व शेती महामंडळ यांच्या हद्दीमुळे निर्माण झालेला अत्यंत गुंतागुंतीचा प्रश्न सोडवून तब्बल १८५ एकर शेतीसाठी रस्ता खुला केला.

७५ वे प्रकरण : हिंगणी येथील शेतरस्त्याचा हा विवाद २०१० पासून प्रलंबित होता. रस्त्याअभावी पारधी वस्तीतील दीडशे लोकांना रहदारीसाठी अडचण होत होती, ज्यातून कित्येकदा पोलिस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल झाले होते. तहसीलदार सावंत यांनी रात्री ८.४५ वाजेपर्यंत पारधी वस्तीवर थांबून सर्वांना समजावून सांगितले. अखेर१० फूट रुंद व १६०० फूट लांबीचा रस्ता सामंजस्यातून उपलब्ध करून दिला. या उपक्रमांतर्गत तालुक्यातील करंजी, चांदेकसारे, जेऊर कुंभारी, शहाजापूर, शिरसगाव, वेस, ओगदी, पढेगाव, मळेगावथडी, रवंदे, धोंडेवाडी, सांगवी भुसार, कोकमठाण, नाटेगाव, जऊर पाटोदा, धारणागाव, देर्डे चांदवड, आपेगाव, येसगाव, कोळपेवाडी, कुंभारी, मढी, तिळवणी, गोधेगाव, वारी, काकडी, सोनेवाडी, मल्हारवाडी, देर्डे कोऱ्हाळे, धामोरी, जवळके, तळेगांव मळे, वेळापूर, हंडेवाडी, धोंडेवाडी, सडे, मनेगाव यांसह आता ब्राह्मणगाव टाकळी, उक्कडगाव, संवत्सर व हिंगणी या गावांचा समावेश झाला आहे.

सामंजस्याने वाद मिटल्याने जय-पराजयाची भावना उरत नाही प्रत्येक शेतकऱ्याला शेतरस्ता मिळाला पाहिजे, हा शासनाचा संकल्प आहे. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही 'बांधावरच न्यायनिवाडा' उपक्रम राबवला.

# गॅस टंचाईवर न्यायालयाचे सरकारला आदेश

## राज्याने तातडीने उपाययोजना कराव्यात

मुंबई (वृत्तसंस्था)

मध्यपूर्वेत सुरू असलेल्या संघर्षाचा परिणाम आता भारतातील इंधन पुरवठ्यावरही दिसू लागला आहे. इराणइस्त्रायल युद्ध सलग दुसऱ्या आठवड्यातही सुरू असल्याने जागतिक स्तरावर ऊर्जा पुरवठा विस्कळीत झाला आहे. त्याचा परिणाम म्हणून भारतात एलपीजी गॅसची टंचाई निर्माण झाल्याचे समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारला महत्त्वपूर्ण निर्देश दिले आहेत. घरगुती वापरासाठी लागणाऱ्या एलपीजीचा पुरवठा प्राधान्याने करण्याची आवश्यकता असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. या टंचाईचा परिणाम हॉटेल व्यवसाय, उद्योग तसेच शाळांसारख्या महत्त्वाच्या संस्थांवरही होत असल्याची माहिती समोर आली आहे.

राज्यात निर्माण झालेल्या या परिस्थितीवर न्यायालयाने गंभीर भूमिका घेतली आहे. या प्रकरणी सरकारने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत, याबाबत सविस्तर माहिती सादर करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. तसेच १७ मार्चपर्यंत राज्य सरकारने आपली भूमिका स्पष्ट करावी असे सांगण्यात आले आहे. घरगुती एलपीजी सिलेंडरचा पुरवठा वाढवण्याची मागणी करत कॉन्फिडन्स पेट्रोलियम इंडिया कंपनीच्या सहा विक्रेत्यांनी न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर न्यायमूर्ती अनिल किलोर आणि न्यायमूर्ती राज वाकोडे यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.

याचिकेत असा आरोप करण्यात आला आहे की, केंद्र सरकारने घरगुती वापरासाठी एलपीजी पुरवठ्याला प्राधान्य देण्याचे आदेश दिले असतानाही काही कंपन्या त्याकडे दुर्लक्ष करत आहेत. विशेषतः कॉन्फिडन्स पेट्रोलियम इंडिया या कंपनीकडून घरगुती एलपीजी सिलेंडरचा पुरवठा वाढवण्याबाबत आवश्यक पावले उचलली जात नसल्याचा दावा करण्यात आला आहे. निर्यात धोरणाचे कारण देत कंपनीने पुरवठा वाढवण्यास नकार दिल्याचा आरोपही याचिकेत करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर न्यायालयाने केंद्र सरकारच्या निर्देशानुसार घरगुती एलपीजी पुरवठ्याला प्राधान्य देण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत.

दरम्यान, मध्यपूर्वेतील संघर्षामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर तेल आणि गॅस पुरवठा मोठ्या प्रमाणावर बाधित झाला आहे

# संपादकीय...

**स्मृतिदिनानिमित्त**

## आधुनिक काळातील विज्ञानसूर्य स्टीफन हॉकिंग

मानवी बुद्धिमत्तेची आणि जिद्दीची पराकाष्ठा कोणती असू शकते, याचे जिवंत उदाहरण म्हणजे प्रख्यात शास्त्रज्ञ स्टीफन हॉकिंग. आधुनिक काळातील विज्ञानसूर्य म्हणून ओळखले जाणारे हे महान शास्त्रज्ञ सहा वर्षांपूर्वी १४ मार्च २०१८ रोजी जगाचा निरोप घेऊन गेले. विज्ञानाच्या क्षेत्रात त्यांनी केलेल्या संशोधनामुळे विश्वाच्या रहस्यांकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला. शारीरिक मर्यादांवर मात करून केवळ बौद्धिक सामर्थ्याच्या जोरावर त्यांनी केलेली कामगिरी आजही जगाला प्रेरणा देणारी आहे. ८ जानेवारी १९४२ रोजी इंग्लंडमधील ऑक्सफर्ड येथे स्टीफन हॉकिंग यांचा जन्म झाला. त्यांचे वडील डॉ. फ्रँक हॉकिंग हे जीवशास्त्राचे संशोधक होते, तर आई इसाबेल यांना शिक्षण आणि सामाजिक कार्याची आवड होती. त्यांच्या जन्माच्या वेळी दुसरे महायुद्ध सुरू असल्यामुळे कुटुंबाने सुरक्षिततेच्या कारणास्तव उत्तर लंडनहून ऑक्सफर्ड येथे स्थलांतर केले होते. काही काळानंतर त्यांच्या वडिलांना नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मेडिसिनमध्ये पार्सिटोलॉजी विभागाचे प्रमुख म्हणून काम करण्याची संधी मिळाल्याने कुटुंब पुन्हा लंडनला परतले. १९५० साली हॉकिंग कुटुंबाने सेंट अल्बान्स येथे स्थायिक होण्याचा निर्णय घेतला. येथेच स्टीफन हॉकिंग यांनी शालेय शिक्षण घेतले. सेंट अल्बान्स स्कूल फॉर गर्ल्स या शाळेत त्यांनी तीन वर्षे शिक्षण घेतले. ही शाळा मुलींसाठी असली तरी लहान मुलांनाही प्रवेश दिला जात होता. बालपणापासूनच स्टीफन हॉकिंग अत्यंत जिज्ञासू आणि बुद्धिमान होते. गणित, भौतिकशास्त्र आणि संगीत या विषयांबद्दल त्यांना विशेष आकर्षण होते. विश्वाच्या गूढ रहस्यांविषयी जाणून घेण्याची त्यांची उत्सुकता लहानपणापासूनच दिसून येत होती. पुढे त्यांनी ऑक्सफर्ड विद्यापीठात प्रवेश घेतला आणि विश्वउत्पत्ती शास्त्राचा अभ्यास सुरू केला. विश्वाची निर्मिती, त्याची रचना आणि त्यातील नियम यांचा शोध घेण्याची त्यांची इच्छा होती. मात्र आयुष्याच्या एका निर्णायक टप्प्यावर त्यांच्यावर मोठे संकट आले. अवघ्या २१ व्या वर्षी त्यांना अमायोट्रोफिक लॅटरल स्क्लेरोसिस या दुर्धर आजाराने ग्रासले. हा आजार मज्जासंस्थेवर परिणाम करून शरीर हळूहळू निष्क्रिय करतो. डॉक्टरांनी त्यांना जास्तीत जास्त दोन वर्षांचे आयुष्य शिल्लक असल्याचे सांगितले. या धक्क्याने ते काही काळ निराश झाले. मात्र इस्पितळातच एका गंभीर रुग्णाला पाहून त्यांना जाणवले की, जीवन कितीही कठीण असले तरी आशा सोडू नये. या आजारामुळे त्यांचे शरीर हळूहळू अचल होत गेले. चालणे, बोलणे आणि दैनंदिन कामे करणेही कठीण झाले. अखेर त्यांना व्हीलचेअरचा आधार घ्यावा लागला. पुढे व्हीलचेअरवर संगणक बसवण्यात आला आणि त्याच्या साहाय्याने ते संवाद साधू लागले. फक्त एका बोटाच्या मदतीने ते संगणकावर काम करत असत. १९८५ साली त्यांना न्यूमोनिया झाला आणि त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली. या शस्त्रक्रियेनंतर त्यांचा आवाज कायमचा गेला. मात्र त्यांनी हार मानली नाही. तंत्रज्ञानाच्या मदतीने तयार करण्यात आलेल्या संगणकीय आवाज प्रणालीद्वारे ते आपले विचार जगापर्यंत पोहोचवत राहिले. दुर्दम्य इच्छाशक्ती, सकारात्मकता आणि ज्ञानाची तळमळ या गुणांच्या बळावर त्यांनी आपल्या शारीरिक मर्यादांवर मात केली. कृष्णविवरांवर केलेल्या त्यांच्या संशोधनाने विज्ञानविश्वाला नवे दिशादर्शन केले. कृष्णविवरे पूर्णपणे काळी नसतात आणि त्यातून किरणोत्सर्ग होऊ शकतो, हा महत्त्वाचा सिद्धांत त्यांनी मांडला. पुढे हा सिद्धांत 'हॉकिंग रेडिएशन' म्हणून प्रसिद्ध झाला. यामुळे विश्वाच्या रचनेविषयी नवे प्रश्न आणि नवे उत्तरांचे मार्ग उघडले. स्टीफन हॉकिंग यांनी अनेक महत्त्वाची पुस्तके लिहिली. त्यापैकी 'अ ब्रीफ हिस्टरी ऑफ टाइम' हे पुस्तक जगभरात प्रचंड लोकप्रिय झाले. या पुस्तकाने विज्ञान सामान्य माणसापर्यंत पोहोचवण्याचे मोठे काम केले. अवकाश, काळ, कृष्णविवरे आणि विश्वाची निर्मिती यांसारख्या गुंतागुंतीच्या संकल्पना त्यांनी अत्यंत सोप्या भाषेत मांडल्या. या पुस्तकावर आधारित अनेक माहितीपट, मालिका आणि चित्रपटही तयार झाले. त्यांनी गणितज्ञ रॉजर पेनरोज यांच्या सहकार्याने सापेक्षतेच्या सिद्धांतावर आधारित विश्वाच्या उत्पत्तीबाबत महत्त्वपूर्ण संशोधन केले. बिग बँग या घटनेतून विश्वाची सुरुवात झाली असावी आणि कृष्णविवरांमध्ये त्याचा शेवट असू शकतो, अशी संकल्पना त्यांनी मांडली. तसेच ब्रह्मांडाला कोणतीही निश्चित सीमा नाही, असेही त्यांनी सुचवले. त्यांच्या संशोधनामुळे आधुनिक विश्वशास्त्राला नवे आयाम मिळाले.


CorelDRAW Ps Ai Id

WE ARE HIRING
JOIN OUR TEAM

GRAPHIC DESIGNER

Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005


## मालपाणी विद्यालयाच्या 'स्मार्ट इको-आर्ट मनी बँक' प्रकल्पाला जिल्हास्तरीय प्रदर्शनात तृतीय क्रमांक



**संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)**–

जाजू इंग्लिश मीडियम स्कूल, संगमनेर येथे जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अहिल्यानगर यांच्या वतीने आयोजित अटल टिंकरिंग लॅब अंतर्गत प्रकल्प प्रदर्शन उत्साहात संपन्न झाले. या प्रदर्शनात मालपाणी विद्यालय, संगमनेर येथील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या स्मार्ट इको आर्ट मनी बँक या अभिनव प्रकल्पाला मेकॅनिकल प्रकारात तृतीय क्रमांक प्राप्त झाला. या विज्ञान प्रदर्शनात संगमनेर व शिर्डी क्लस्टरमधील सुमारे ५० शाळांनी सहभाग नोंदविला होता. सीबीएसई, इंग्लिश मीडियम तसेच सैनिकी शाळांसारख्या नावाजलेल्या संस्थांनीही या प्रदर्शनात सहभाग घेतला. प्रदर्शनात इलेक्ट्रॉनिक्स, मेकॅनिकल, डिजिटल लिटरसी आणि थीम बेस्ड अशा चार विभागांमध्ये प्रकल्प सादर करण्यात आले.

हा प्रकल्प आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित असून पारंपरिक मनी बँकेला तांत्रिक स्वरूप देत ती अधिक सुरक्षित व आकर्षक बनविण्यात आली आहे. या मॉडेलमध्ये आर्डुइनो, कीपॅड, एलसीडी डिस्प्ले आणि सर्व्हो मोटर यांचा वापर करण्यात आला आहे. कीपॅडद्वारे पासवर्ड टाकल्यानंतरच मनी बँक उघडते, त्यामुळे त्यामधील पैसे सुरक्षित राहतात. या मॉडेलच्या वरच्या भागात छोटा प्लँटर ठेवून त्यामध्ये रोप लावण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला आहे. तसेच मॉडेलवर वारली कलेची सजावट करून भारतीय संस्कृतीची झलकही दाखविण्यात आली आहे. विद्यार्थ्यांमध्ये बचतीची सवय, तंत्रज्ञानाची ओळख आणि पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण करणारा हा अभिनव प्रयोग ठरला.

मेकॅनिकल विभागात मालपाणी विद्यालय येथील कु. आरुष शिंदे व अनुजा आभाळे यांच्या स्मार्ट इको आर्ट मनी बँक या प्रकल्पाला तृतीय क्रमांक मिळाला. तसेच थीम बेस्ड विभागात अमोल सस्कर यांनी सादर केलेली 'कांद्याची चाळ' ही संकल्पना परीक्षकांना विशेष आवडली. यामध्ये कांदा सडणे व दीर्घकाळ साठवण ही शेतकऱ्यांसमोरची मोठी समस्या लक्षात घेऊन आधुनिक फिरती कांदा चाळ तयार करण्यात आली आहे. या चाळीत कांद्याची सतत हालचाल होत असल्याने त्याला सर्व बाजूंनी हवा लागते व तो कोरडा राहतो. त्यामुळे कांदा सडण्याचे प्रमाण कमी होऊन दीर्घकाळ सुरक्षित साठवण शक्य होते. प्रकल्पाचे पेटंट दाखल करण्याबाबत मार्गदर्शनही परीक्षकांनी केले.

इलेक्ट्रॉनिक्स विभागात श्रावणी बुकदाणे यांचे जॉयस्टिक मॉडेल, डिजिटल लिटरसी विभागात हर्षवर्धन शेवकर व अमोल सस्कर यांचा मॅथ्स कॅल्क्युलेटर प्रकल्प, तर थीम बेस्ड विभागात अनुज गुंजाळ, हर्षवर्धन शेवकर, आदर्श चंद्रकांत खंडागळ यांनी केलेले मॉडेल सादर करण्यात आले. या सर्व विद्यार्थ्यांचा व मार्गदर्शक शिक्षकांचा गौरव जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अहिल्यानगरचे प्राचार्य डॉ. राजेश बनकर व पर्यवेक्षक यांच्या हस्ते समारंभपूर्वक करण्यात आला.

सदर प्रकल्प साकारण्यासाठी मुख्याध्यापक उत्तम एरंडे व पर्यवेक्षिका रंजना पवार यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी विशेष मेहनत घेतली. या यशाबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे पदाधिकारी, मुख्याध्यापक, पर्यवेक्षिका, सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालकांनी अभिनंदन केले.

## संगमनेर जिल्हा निर्मितीचा...

पान ०२ वरुन

ठोठावण्यात आला असला तरी त्या दंडाची वसुली महसूल विभागाकडून प्रभावीपणे होत नाही त्यामुळे अवैधरित्या गौणखनिज वाहतूक करणाऱ्यांवर केवळ दंड ठोठावून थांबू नये, तर त्यांच्या मालमत्तेवर दंडाची रक्कम टाकून वसुलीची प्रक्रिया राबवावी, तसेच अवैध गौणखनिज उत्खननावर कडक आणि परिणामकारक कारवाई करून हा प्रकार पूर्णपणे थांबवावा, अशी ही मागण आ. खताळ यांनी मुख्यमंत्री व महसूल मंत्र्यांकडे केली आहे.

## गॅस दरवाढी विरोधात ... पान ०२ वरुन

केंद्र सरकार हे गोरगरिबांच्या विरोधी असून तातडीने गॅस दरवाढ कमी करावी व सर्वसामान्य नागरिकाला दिलासा द्यावा अशी मागणी त्यांनी केली. तर अजय फटांगरे म्हणाले की केंद्र सरकार हे थापेबाज सरकार आहे. अमेरिके पुढे केंद्र सरकार झुकले असून रशियाबरोबर करार करण्यासाठी अमेरिकेची परवानगी लागते आहे. हीच का ५६ इंची छाती असा सवाल करताना तातडीने गॅस दरवाढ मागे घ्या अन्यथा भारतामध्ये तीव्र आंदोलन छेडले जाईल असा इशारा त्यांनी दिला. तर पद्माताई थोरात यांनी केंद्र सरकारच्या व राज्य सरकारच्या कामाचे वाभाडे काढले. यावेळी केंद्र सरकारच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली प्रांताधिकारी अरुण उंडे यांनी निवेदन स्वीकारले.

## महाराष्ट्रावर अवकाळी... (पान ०२ वरुन)

यामुळे शेती आणि फळबागांना फटका बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, राज्यातील अनेक भागांमध्ये तापमानही झपाट्याने वाढताना दिसत आहे. अलीकडेच अमरावती येथे ४२.२ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली असून ते त्या दिवशी देशातील सर्वाधिक तापमान ठरले. मार्च महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यातील सरासरी तापमानाच्या तुलनेत ही नोंद अधिक असल्याचे हवामान विभागाने सांगितले आहे.


**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
ZARINA ISHAQUE PATHAN
TO NEW NAME AS
ZARINA JUNED SHAIKH
ADD- GHAR NO 71 NAIKWADPURA PWD OFFICE SAMOR SANGAMNER 422605 DIST - AHILYANAGAR

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
JUNAID SHAIKH FAZALURREHMAN
TO NEW NAME AS
JUNED FAJLURRAHEMAN SHAIKH
ADD- GHAR NO 71 NAIKWADPURA PWD OFFICE SAMOR SANGAMNER 422605 DIST - AHILYANAGAR

**पाहिजेत**
कन्स्ट्रक्शन सुपरवाईजर
डिप्लोमा/ डिग्री इंजिनिअर
अनुभवास प्राधान्य
संपर्क - करवा एजन्सीज बस स्टँड मागे, संगमनेर
9422762700

**पाहिजेत**
अनुभवी व गरजू
साईट सुपरवायझर
साईट इंजिनियर
१ ते २ वर्षांचा अनुभव आवश्यक
चिंतामणी डेव्हलपर्स, संगमनेर
7741057560

**पाहिजेत**
आत्मशांती टी सेंटर (सपट चहा)साठी जागा भरणे आहे.
हेल्पर - ०१
संपर्क- नेहरु चौक, संगमनेर
9922113534
9730468090

**पाहिजेत**
मुलगा/ पुरुष कर्मचारी
आकर्षक पगार
श्री विश्वगंध आयुर्वेद हॉस्पिटल नवीन नगर रोड संगमनेर
Biodata सह भेटणे
9822283079

**पाहिजेत**
ऑफिसबॉय (शिपाई) ०१ जागा (पुरुष)
शैक्षणिक पात्रता– १०/१२ वी पास
वयमर्यादा– २० ते ४० वर्ष
इच्छुकांनी संस्था कार्यालयात लेखी अर्जासह कागदपत्र दि. १४/०३/२०२६ पर्यंत जमा करावे
संपर्क– महेश नागरी सहाकरी पतसंस्था मर्या. संगमनेर, अशोक चौक, संगमनेर
फोन– ०२४२५–२२०७७७
email- mahesh.patsanstha@gmail.com

**पाहिजेत**
स्कुप अँड जॉय या नामांकित कुल्फी ब्रँडसाठी खालील जागा भरणे आहे
सेल्स एक्सिक्युटिव्ह (४ जागा)
हिंगे मिल्क अँड मिल्क प्रोडक्ट्स प्रा. लि. संगमनेर
9112069393

**पाहिजेत**
अकाउंटंट (महिला/ पुरुष)
अनुभवास प्राधान्य
पत्ता- अकोले बायपास रोड, संगमनेर
8308111211

**बौद्ध वधू पाहिजे**
वर वय ३७, प्रोफेसर, गोरा, उंच आकर्षक व्यक्तीमत्व, घटस्फोटीत (अपत्य नाही)
अपेक्षा - अविवाहित वधुला प्राधान्य, विवाहित (अपत्य नसलेली) गृहिणी धार्मिक शाकाहारी, जातीची अट नाही.
अनुरूप पाहिजे
9922221693
घुलेवाडी, ता. संगमनेर

**धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल**
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा, स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

**जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी**

त्वरीत पाहिजेत
सेल्सपर्सन ०६ जागा
(अनुभवी पुरुष / महिला) आकर्षक पगार व सवलती
संपर्क - 75882 49849, 9860444881
जानकीराम गंगाधर काजळे (ज्वेलर्स)
मेनरोड, राजेंद्र क्लॉथ समोर, संगमनेर, ०२४२५, ७५८८२४९८४९

सिद्धार्थ एंटरप्राईजेस, संगमनेर, कॅनरा बँकेजवळ, नवीन नगर रोड,
पेपर डिलिंग कंपनी करिता खालील जागा भरणे आहे
सेल्स एक्झीक्युटिव -१ (एमबीए असल्यास प्राधान्य)
ऑफिस असिस्टंट -१ (कॉम्पुटरचे ज्ञान आवश्यक)
कार ड्रायव्हर - १ (अनुभव असल्यास प्राधान्य)
घरकाम करणारी महिला- १ (सर्व घरकाम)
अर्जासह समक्ष भेटावे
संपर्क - 9822399371/ 7879708888

पाहिजेत सह्याद्री अ‍ॅग्रोव्हेट कंपनीसाठी
मशीन ऑपरेटर/ हेल्पर नेमणे आहे
वेतन – २०,००० ते २५,०००
शिक्षणाची अट नाही
२ वेळा अल्पोपहाराची सोय
PF आणि ESIC सुविधांसह
पत्ता– प्लॉट नं. ४२, औद्योगिक वसाहत, पाण्याच्या टाकी जवळ, संगमनेर, एम.आय.डी.सी.
संपर्क - 8484046463, 9527426464

**त्वरित पाहिजेत**
द्वारकादास शामकुमार
सेल्समन, कॅशियर, स्टोअर मॅनेजर, फ्लोअर मॅनेजर, हेल्पर, सिक्युरीटी
कामाची सोयीस्कर वेळ १० ते ७ / १२ ते ९
9511238422

**पाहिजेत**
हॉटेल दौलत रिफ्रेशमेंट घारगाव करिता पाहिजेत
अकौंटंट - १
कॅशियर - ४
स्टोअर किपर - २
9665022661
8329104856

**सुभाष मनाजी शहाणे ज्वेलर्सकरिता पाहिजेत**
सेल्स पर्सन - १० पदे
१ ते २ वर्षांचा ज्वेलरी/रिटेल क्षेत्रातील अनुभव
शिक्षण - १२ वी उत्तीर्ण
8237510210
9890499699

**पाहिजेत**
वेल्डिंग कामासाठी कामगार पाहिजेत
वेल्डर
हेल्पर
7972963397

**पाहिजेत**
कॉम्प्युटर ऑपरेटर - ०१
अ‍ॅडव्हान्स एक्सेलचे ज्ञान आवश्यक
अकाउंटंट - ०१
टॅलीचे ज्ञान आवश्यक
किमान ०१ वर्षांचा अनुभव
आकर्षक पगार
बालाजी एअर प्रोडक्ट, संगमनेर
8600828485
9511833320

**ड्रायव्हर पाहिजे**
साईकृपा एंटरप्राईजेस
पिकअप/छोटा हत्ती (लोकल वाहतुक) गाडी चालवण्यासाठी ड्रायव्हर पाहिजे
पत्ता– मालपाणी मल्टिप्लेक्स समोर, संगमनेर
9767059977

**पाहिजेत**
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ऑसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६

**अभय ट्रेडिंग कंपनी करिता त्वरीत पाहिजे**
कॉम्प्युटर ऑपरेटर – ०२
सेल्यमन – ०२
ड्रायव्हर – ०२
दुकान काम व शोरुमसाठी – ०२ जागा
महिला कामगार – ०२
9822097904






MALPANI
अक्षयतृतीयेच्या शुभमुहूर्तावर
मालपाणी उद्योग समूह आयोजित
भव्य सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा!
रविवार, दि. १९ एप्रिल २०२६, सायं.४ वाजता | ठिकाण – मालपाणी लॉन्स, कॉलेज रोड, संगमनेर
- प्रत्येक नवविवाहित दाम्पत्याला स्टील कपाट, दिवाण–गादी व संसारोपयोगी साहित्य भेट!
- वरासाठी ड्रेस, फेटा/उपरणे व वधुसाठी साडी
- सर्वांसाठी भोजन व्यवस्था

सर्वधर्मीयांसाठी खुला व मोफत विवाह सोहळा
नोंदणीसाठी कायद्यानुसार वधूचे वय १८ वर्षे व वराचे वय २१ वर्षे असणे बंधनकारक
विवाह नोंदणी सुरु झाली आहे, त्वरित संपर्क करावा...प्रवेश मर्यादित!
संपर्क : एच.आर. विभाग, मालपाणी इंडस्ट्रीयल पार्क, अकोले रोड, संगमनेर
श्री. राहुल शेरमाळे (9960 253 607) | श्री. रविंद्र कानडे (9850 890 618)


दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९
७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४

वाचकांसाठी निवेदन– सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

मणके विकार, गुडघेविकार, अस्थिविकार
सुरिक्षत, खात्रिशीर व परीपूर्ण उपचारासाठी आजच भेटा
डॉ. सुभाष दत्तात्रय मंडलिक
मणके विकार, गुडघेविकार
व अस्थिविकार चिकीत्सक
(२४ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव)
मंदना मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
लक्ष्मी नगर, रहाणे मळा, संगमनेर
संपर्क - ९८२२७०९०३०

जिथे काळजी आणि उपचार एकत्र येतात...
ताम्हाणे हॉस्पिटल
• मेडिसिन • सर्जरी
• स्त्रीरोग – प्रसुति
• मुळव्याध–भगंदर–फिशर
• लेझर सेंटर
डॉ. ताम्हाणे विशाल वसंत
(M.S.) शल्य
कन्सल्टंट जनरल व लेझर सर्जन
डॉ. ताम्हाणे रुपाली विशाल
स्त्रीरोग / प्रसुती चिकित्सक
इंदिरा नगर, गल्ली नं. १०, संगमनेर
: Help Line :
7219 100 100

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com



# खेळाडूंसाठी क्रीडा 'ई-प्रमाण' प्रणाली कार्यान्वित



**(जिल्हा माहिती कार्यालयाकडून)–**
महाराष्ट्र राज्यातील गुणवंत खेळाडूंना शासकीय व निमशासकीय सेवांमधील ५ टक्के आरक्षणाचा लाभ सुलभ, पारदर्शक व जलद पद्धतीने मिळावा यासाठी क्रीडा व युवक सेवा संचालनालयाने 'क्रीडा ई-प्रमाण' ही अद्ययावत ऑनलाईन प्रणाली कार्यान्वित केली आहे. या प्रणालीद्वारे खेळाडूंना घरबसल्या डिजिटल प्रमाणपत्र मिळणार असून भविष्यातील पदभरती प्रक्रियेसाठी ते अनिवार्य करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांनी दिली.

ही प्रणाली ब्लॉकचेन व कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानावर आधारित असल्यामुळे प्रमाणपत्रात कोणताही फेरफार किंवा मानवी हस्तक्षेप शक्य नाही. खेळाडूने आवश्यक माहिती भरल्यानंतर व मूळ नोंदी जुळल्यास अवघ्या २४ तासांत डिजिटल पडताळणी अहवाल उपलब्ध होतो. प्रत्येक प्रमाणपत्रावर अद्वितीय क्यूआर कोड असल्याने नियुक्ती प्राधिकरणांना त्याची सत्यता तत्काळ तपासता येणार आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोग तसेच इतर शासकीय भरतीसाठी अर्ज करताना क्रीडा ई-प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक करण्यात आले आहे. यापूर्वी विभागीय पातळीवर प्रमाणपत्र पडताळणी केलेल्या खेळाडूंनाही नव्या प्रणालीतून डिजिटल प्रमाणपत्र तयार करून घेणे आवश्यक आहे.

नोंदणीसाठी खेळाडूंनी https://sports.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर जाऊन 'अवर सर्व्हिसेस'मधील ५ टक्के आरक्षण या विभागातून एकदाच नोंदणी करावी. यासाठी आधार-संलग्न मोबाईल क्रमांक, ई-मेल आयडी, आधार कार्ड पीडीएफ व स्पर्धेतील प्रावीण्य प्रमाणपत्र (पीडीएफ) आवश्यक आहे. स्पर्धेचे अभिलेख उपलब्ध नसल्यास 'ग्रिव्हियन्स' पर्यायाद्वारे अर्ज करता येणार असून संबंधित कागदपत्रांसह तक्रार नोंदवावी लागेल. अर्जानंतर विभागीय स्तरावर पडताळणी करून नोंदी प्रणालीवर अद्ययावत केल्या जातील.

कबड्डी, फेन्सिंग, ट्रायथलॉन (२०२५), ज्यूडो (२०२४) व कुराश (२०१९-२० व २०२४-२५) या स्पर्धांचे अभिलेख ऑनलाईन उपलब्ध आहेत. त्यामुळे सध्या केवळ याच खेळांच्या खेळाडूंनी प्रमाणपत्रासाठी अर्ज करावेत. इतर पात्र खेळांच्या खेळाडूंनी केवळ प्रणालीवर नोंदणी करावी. इतर खेळांच्या नोंदी अपलोड करण्याची प्रक्रिया सुरू असून अधिक माहितीसाठी खेळाडूंनी क्रीडा विभागाच्या संकेतस्थळाला भेट द्यावी, असेही कळविण्यात आले आहे.

# औरंगपूर येथे नवीन ट्रान्सफॉर्मरचे उद्‌घाटन

**शिबलापूर**
**(युवावार्ता प्रतिनिधी)–**
संगमनेर तालुक्यातील औरंगपूर येथे नवीन ट्रान्सफॉर्मर रोहित्रचे उद्घाटन जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष सौ. शालिनीताई विखे पाटील यांच्या हस्ते उद्घाटन संपन्न झाले. संगमनेर तालुक्यातील औरंगपूर येथील डोळे चोपडे वस्ती, जोंधळे वस्ती येथे नवीन ट्रान्सफॉर्मर रोहित्रचे उद्घाटन जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष शालिनीताई विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. औरंगपूर येथे अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री, महाराष्ट्र राज्य, डॉ. राधाकृष्ण विखे पाटील साहेब व जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष सौ. शालिनीताई विखे पाटील, खा. डॉ. सुजयदादा विखे पाटील यांच्या माध्यमातून हे सर्व ट्रान्सफॉर्मर मंजूर होऊन बसविण्यात आलेले आहेत.



वदक वस्ती, गोरक्षवाडी तांबे, तळोले वस्ती, जोंधळे वस्ती, चोपडे वस्ती, डोळे वस्ती, जोंधळे वस्ती, चोपडे वस्ती या ठिकाणी नवीन ट्रान्सफॉर्मर बसवण्यात आलेले आहे. जलसंपदामंत्री ना. डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष सौ. शालिनीताई विखे पाटील व खासदार सुजयदादा विखे पाटील यांच्या माध्यमातून औरंगपूर परिसराचा विकास झालेला आहे. यावेळी जनसेवा मंडळाचे अध्यक्ष विजयराव डेंगळे, लक्ष्मण चोपडे, इंद्रभान तांबे, सरपंच सौ. लक्ष्मीबाई वाकचौरे, उपसरपंच मीनाक्षी वदक, गीताराम डोळे, भाऊसाहेब तळोले, भाऊसाहेब वदक, ज्ञानेश्वर तांबे, साहेबराव तांबे, भाकर तांबे, दगडू चोपडे, राजेंद्र आरगडे, सचिन तळोले, सुमित डेंगळे, मनोज मेहेरे, वीज कंपनीचे अधिकारी सौ. महाले, प्रकाश तांबे व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

औरंगपूर येथे ट्रान्सफॉर्मर बसवल्याबद्दल जलसंपदा मंत्री श्री राधाकृष्ण विखे पाटील साहेब, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष सौ. शालिनीताई विखे पाटील, खा. डॉ. सुजयदादा विखे पाटील यांचे औरंगपूरमधील सर्व ग्रामस्थ व शेतकरी बांधवांनी अभिनंदन केले आहे.

# संगमनेरमध्ये 'ॲलेन सोली'चे भव्य दालन

**संगमनेर**
**(युवावार्ता प्रतिनिधी)–**
शहरी फॅशन जगतात आपली वेगळी ओळख निर्माण करणारा प्रिमियम ब्रँड 'ॲलेन सोली' आता संगमनेरकरांच्या सेवेत दाखल होत आहे. 'आदित्य बिर्ला फॅशन ॲण्ड रिटेल लिमिटेड' समूहाचा हा लोकप्रिय ब्रँड पुरुष आणि मुलांसाठी फॉर्मल तसेच कॅज्युअल कपड्यांसाठी देशभर प्रसिद्ध आहे. आधुनिक डिझाइन, आकर्षक रंगसंगती आणि आरामदायी फॅब्रिक यामुळे या ब्रँडने शहरी भारतातील कामाच्या ठिकाणी कपडे घालण्याच्या पद्धतीत मोठा बदल घडवून आणला आहे.

संगमनेर शहरातील अकोले बायपास रोड, विठ्ठल मंदिर समोर या ठिकाणी 'ॲलेन सोली'चे भव्य दालन ग्राहकांच्या सेवेसाठी सुरू होत आहे. या दालनाचा शुभारंभ शुक्रवार, दि. १४ रोजी विविध मान्यवरांच्या हस्ते होणार असून शहरातील फॅशनप्रेमींसाठी हा एक खास आकर्षणाचा विषय ठरणार आहे. 'ॲलेन सोली' हा ब्रँड 'फ्रायडे ड्रेसिंग' या संकल्पनेसाठी विशेष ओळखला जातो. ऑफिसमधील औपचारिक वातावरणापासून ते मित्रपरिवारासोबतच्या अनौपचारिक भेटीपर्यंत सहज परिधान करता येतील असे कपडे या ब्रँडमध्ये उपलब्ध असतात. आधुनिक शैली आणि आराम यांचा उत्तम संगम असलेले कपडे ही या ब्रँडची खासियत मानली जाते.

या नव्या दालनात ग्राहकांसाठी शर्ट, ट्राउझर्स, जीन्स, टी-शर्ट, सूट, ब्लेझर तसेच विविध ॲक्सेसरीजचा आकर्षक संग्रह उपलब्ध होणार आहे. उच्च दर्जाचे, टिकाऊ आणि आरामदायी फॅब्रिक वापरून तयार केलेले हे कपडे ऑफिससह दैनंदिन वापरासाठीही उपयुक्त ठरणार आहेत. संगमनेरमध्ये सुरू होणाऱ्या या भव्य दालनामुळे शहरातील ग्राहकांना आता आधुनिक आणि ब्रँडेड फॅशनचा दर्जेदार पर्याय स्थानिक पातळीवर उपलब्ध होणार असल्याने फॅशनप्रेमींमध्ये उत्सुकता व्यक्त होत आहे.

# श्री विश्वकर्मा पांचाळ तांबट समाजाचा महिला दिन उत्साहात



**संगमनेर**
**(युवावार्ता प्रतिनिधी)–**
श्री विश्वकर्मा पांचाळ तांबट समाज व महिला मंडळाच्या वतीने आंतरराष्ट्रीय महिला दिन उत्साहात आणि आनंदमय वातावरणात साजरा करण्यात आला. विविध सांस्कृतिक कार्यक्रम, मार्गदर्शन आणि मनोरंजक उपक्रमांनी हा कार्यक्रम रंगला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून दंतरोग, त्वचारोग तसेच केस विकार तज्ञ डॉ. अनुजा घुले उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या सुरुवातीला त्यांनी महिलांच्या आरोग्याविषयी महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत महिलांनी स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करू नये, तसेच दात, त्वचा आणि केसांच्या आरोग्याची योग्य काळजी कशी घ्यावी याबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली. उपस्थित महिलांनीही उत्साहाने विविध प्रश्न विचारून आपल्या शंका मांडल्या. डॉ. घुले यांनी त्या सर्व शंकांचे समाधानकारक निरसन केले.

कार्यक्रमात लहान मुलींपासून ते ज्येष्ठ नागरिक महिलांपर्यंत सर्वांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. भजन, गवळण, कविता, प्रार्थना, गायन, नृत्य अशा विविध कलाविष्कारांचे सादरीकरण करण्यात आले. याशिवाय विविध प्रकारचे मनोरंजक खेळही आयोजित करण्यात आले होते. या खेळांमध्ये महिलांनी उत्स्फूर्तपणे भाग घेत कार्यक्रमाची रंगत वाढवली. कार्यक्रमातील विशेष आकर्षण म्हणजे प्रत्येक महिलेला स्टेजवर येऊन आपले मनोगत व्यक्त करण्याची संधी देण्यात आली. महिलांनी आत्मविश्वासाने आपले विचार मांडत एकमेकांना प्रेरणा दिली. त्यामुळे संपूर्ण कार्यक्रम अधिक रंगतदार आणि प्रेरणादायी ठरला.

या कार्यक्रमात ज्येष्ठ नागरिक महिलांचा उत्स्फूर्त सहभाग विशेष लक्षवेधी ठरला. वयाच्या विविध टप्प्यांवर असतानाही त्यांनी भजन, गाणी, खेळ आणि मनोगत व्यक्त करत कार्यक्रमात आनंदाने सहभाग घेतला.

अनेक ज्येष्ठ महिलांनी स्टेजवर येऊन आपले अनुभव, आठवणी आणि प्रेरणादायी विचार मांडले. त्यांच्या सहभागामुळे कार्यक्रमाला वेगळीच उबदारता आणि प्रेरणा मिळाली. तरुण महिलांसाठीही त्यांच्या अनुभवातून मार्गदर्शन मिळाले. कार्यक्रमानंतर सर्वांनी एकत्र येऊन स्वादिष्ट भोजनाचा आस्वाद घेतला. एकूणच श्री विश्वकर्मा पांचाळ तांबट समाज महिला मंडळाचा महिला दिनाचा हा कार्यक्रम सुंदर, प्रेरणादायी आणि अविस्मरणीय ठरला.

# तीर्थरुप दादा : दिपस्तंभ...

**स्मृतिदिनानिमित्त आदरांजली...**



स्वतंत्र भारताच्या इतिहासात महाराष्ट्राचे मोठे स्थान आहे. महाराष्ट्र हा जसा डोंगर, दर्या खोर्या, समुद्रकिनारा अशा विविधतेने नटलेला आहे, तसाच तो मोठ्या कर्तबगार व्यक्तींची जन्मभमी व कर्मभमीही राहिला आहे. छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संत, महाराजे, कवी, लेखक, साहित्यीक ते यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील यांच्या नेतृत्वापर्यंत सर्वांनी आपल्या कार्यातून छाप सोडली आहे. या सर्वांच्या विचाराचा पगडा असणारे स्व. भाऊसाहेब संतुजी थोरात उर्फ तीर्थरुप दादा यांच्या व्यक्तीमत्वाची जडण-घडण स्व. डॉ. अण्णासाहेब शिंदे यांच्या बरोबरीने स्वातंत्र्य चळवळीच्या मुशीत झाली. स्वातंत्र्य आंदोलनात महत्वाची भूमिका बजावणार्या दादांनी स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सहकाराचा मार्ग निवडला. सहकारातून गोरगरिबांचे जिवनमान उंचविण्यासाठी रचनात्मक कार्यातून सहकाराला नवी दिशा दिली. प्रगतीचा राजमार्ग असणार्या सहकारात पारदर्शकता, आर्थिक शिस्त, काटकसर, आधुनिकता व समाजउपयोगिता हे नवे तत्वे राबवितांना एक नवा मंत्र दिला. यशस्वितेसाठी प्रत्येकाच्या जिवनात मार्गदर्शकाची भूमिका महत्वाची असते. तीच भूमिका माझ्या जिवनात व तालुक्याच्या सर्वांगिण विकासात दादांची राहिली. दादांनी सहकार हा आपल्या कुटूंबाच्या पलिकडे जपला. तो वाढविला आणि कार्यकर्त्यांची मोठी फळी निर्माण केली.

महाविद्यालयीन शिक्षण पुर्ण झाल्यानंतर मी संगमनेरला वकिलीची प्रॅक्टीस सुरु करायला लागलो. दादांचे सहकार व समाजकार्य सुरु होते. या काळात विडी कामगारांच्या आंदोलनात मी सहभाग घेतला. औरंगाबाद विद्यापीठ नामांतर, कामगार, विडी आंदोलनातील सहभाग यामुळे माझा समाजकार्याला प्रारंभ झाला. पुढे दादांनी शेतकर्यांना जोडधंदा म्हणून सुरु केलेल्या दुग्ध व्यवसायाचा १९८२ पासून आम्ही तरुण मुले प्रचार प्रसार करु लागलो. गावोगावी बैठका, मेळावे घेवून तालुक्यात दुध संस्था सुरु केल्या.

१९८५ च्या विधानसभा निवडणूक माझ्या जीवनात मैलाचा दगड ठरली. जनतेच्या आग्रहास्तव मला अपक्ष म्हणून कार्यकर्त्यांनी निवडणूकीत उतरविले. काँग्रेस पक्षाच्या विरोधात जाणे दादांना कधीच मान्य नव्हते. त्यांनी साधा कधी माझ्या प्रचारात सहभागही घेतला नाही. ते आपल्या तत्वाशी कायम एकनिष्ठ राहिले. १९८५ ची निवडणूक जिंकल्यानंतर समाजकरणाचे काम करतांना दादांची कार्यपद्धती हीच आपल्यासाठी दिपस्तंभाप्रमाणे ठरली. साधी राहणी, पारदर्शक कारभार, सतत लोकांची कामे करणे हा मंत्र मी जपला.

त्यानंतर पुढे दिवसेंदिवस कार्यकर्त्यांचा संग्रह वाढत गेला. तालुक्यातील वाडी वस्ती, नदी, नाले, रस्ते, डोंगर दर्या यांची भौगोलिक माहिती झाली. यामुळे विकासकामांच्या विविध योजना मार्गी लावतांना मोठा उपयोग झाला. तालुक्यासाठी व तळेगांव भागासाठी असलेले निळवंडे धरण पुर्ण होणे हे दादांचे स्वप्न होते. यासाठी आ. मधुकरराव पिचड यांच्या सहकार्याने हे काम मार्गी लावण्यास मी प्राधान्य दिले. दादांची तालुक्याच्या विकासाबाबत सहकारावर करडी नजर होती. ते नेहमीच म्हणत, सहकार संस्था ह्या मुलांप्रमाणे सांभाळा. या संस्थांमध्ये विश्वस्त म्हणून काम करतांना आपल्याला काय देता येईल ते योगदान द्या. त्यातून संस्था वाढतील व त्याचा जनसामान्यांना फायदा होईल.

दादांची स्मरणशक्ती आफाट होती. कार्यकर्त्यांना ते अगदी नावानिशी हाक मारत प्रेरणा देत. आळस, अंधश्रद्धा, नकारात्मक दृष्टीकोन या सर्वांचा त्यांना राग होता. विज्ञानवादी वारकरी असलेले दादा हे साहित्याचे मोठे चाहते होते. विविध क्षेत्रातील मान्यवरांना कार्यक्षेत्रावर बोलावून ते त्यांचे मार्गदर्शन सर्वांसाठी घडवून आणत. यामध्ये यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, विलासराव देशमुख, य. दि. फडके, राम कदम, ना. धो. महानोर, डॉ. विठ्ठल वाघ, नामदेव ढसाळ, नारायण सुर्वे, माजी पंतप्रधान चंद्रशेखर या दिग्गजांचा समावेश राहिला.

दादांना कधीही खोटे आवडले नाही. स्पष्टोक्तेपणे हे त्यांचे मोठे गुणवैशिष्ट्ये राहिले. कधीही चुकीच्या गोष्टींना त्यांनी पाठीशी घातले नाही. त्यामुळे आमच्या सारख्या सर्व कार्यकर्त्यांना एक मोठी शिस्त लागली. आम्हाला वैचारिक अधिष्ठान लाभले. चांगली कामे करतांना या सकारात्मक विचाराचे मोठे पाठबळ मिळाले.

तालुक्याच्या विकसाच्या प्रत्येक टप्प्यावर त्यांचे मार्गदर्शन महत्वाचे राहिले. १९९९ मध्ये काँग्रेस व राष्ट्रवादीच्या विभाजनावेळी दादांनी राष्ट्रीय काँग्रेस पक्षात राहण्याचा सुरदृष्टी निर्णय घेतला. त्यांची काँग्रेसच्या विचारांवर निष्ठा होती. १९९९ मध्ये स्व. विलासराव देशमुख यांच्या मंत्री मंडळात मी आवडीचे पाटबंधारे खाते मागावून घेतले. निळवंडे धरणाच्या कामाला प्रारंभ केला. आधी पुर्नवसन मग धरण हा अनोखा पॅटर्न राबवितांना आमची जार्वे येथील ५ एकर जमिन दिली. या कामातील अडथळे माजी मंत्री मधुकरराव पिचड यांच्या सहकार्यातून दूर केले. अनेक अडथळ्यावर मात करत निळवंडे धरण पुर्ण केले. या कामाची पाहणी करण्यासाठी दादा वेळोवेळी निळवंडे धरणाला भेट देत राहिले. आदिवासी पुनर्वसीत यांचे प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घेत राहिले.

२००४ मध्ये कृषी मंत्री पद सांभाळतांना शासनाच्या विविध योजना शेतकर्यांच्या बांधावर पोहचवा, हा मोलाचा सल्ला दिला. मी राज्यभर फिरुन दुष्काळात शेतकर्यांना मदत करत होतो. या काळात शेतीत विविध नविन योजना राबविल्या गेल्या. १ लाख शेततळ्यांची निर्मीती, महापीक अभियानातून २००६ मध्ये राज्यात आतापर्यंतचे सर्वाधिक कृषी उत्पन्न झाले. मंत्री मंडळात विविध खाती सांभाळतांना दादांची काम करण्याची शैली मोठी मार्गदर्शक ठरली. दिवसाची सुरुवात सकाळी ६ ते रात्री १२ पर्यंत सातत्याने दौरे, बैठका, कार्यकर्त्यांच्या भेटी गाठी, जनतेची कामे मार्गी लावणे या सर्व गोष्टींना प्राधान्य दिले. कधीही विश्रांती घेतली नाही.

संगमनेर तालुक्यातही विकासाच्या अनेक योजना राबविल्या जात होत्या. सहकारी संस्था आर्थिक दृष्ट्या सक्षम बनविणे, त्या पारदर्शक व आदर्शवत चालविणे हे आम्हा कार्यकर्त्यांचे काम आम्ही चोखपणे पार पाडत होतो. २००६ मध्ये दादांनी पर्यावरण संवर्धनासाठी वयाच्या ८४ व्या वर्षी दंडकारण्य अभियान राबविले. तालुक्यातील सर्व जनता, विद्यार्थ्यांच्या सहभागाने हे अभियान आता मोठी लोकचळवळ झाले आहे. दरवर्षी कोटी बियांचे रोपन करुन वृक्षसंवर्धन आणि वृक्षसंगोपणाची संस्कृती तालुक्यात वाढली आहे. या अभियानाची आंतरराष्ट्रीय पातळीवर दखल घेण्यात आली.

देशातील, राज्यातील व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी या अभियान आंदोलनाचे कौतुक केले आहे. दादांनी अगदी शेवटच्या श्वासापर्यंत या तालुक्याचा विकास हाव ध्यास जपतांना कार्यकर्त्यांना सदैव बळ दिले. अगदी आजारपणातही प्रत्येक कार्यकर्त्याची काळजी घेतली. दृढनिश्चयी व स्पष्टोक्ते असलेल्या दादांच्या जिवन कार्यावर अमेय प्रकाशनने दादांनी लिहलेले अमृतगाथा व अमृतमंथन ही जिवनचरित्रे नव्या पिढीसाठी प्रेरणास्त्रोत ठरली.

१४ मार्च २०१० रोजी स्व. तिर्थरुप दादांच्या जाण्याने माझ्यासह तालुक्याच्या जिवनात मोठी पोकळी निर्माण झाली. एक दिपस्तंभ हरपला. मात्र त्यांचे विचार सदैव पाठीशी ठेवून आम्ही सदैव काम करत राहिलो. नि:कोप व सुसंस्कृत राजकारणाची मोठी परंपरा निर्माण करुन तालुका रयात विकासाचे मॉडेल ठरला. यासाठी मंत्रीपदाच्या काळात प्रत्येक खात्याला न्याय दिला. महसूल खात्याला तर अगदी लिम्का बुक ऑफ रेकॉर्डने गौरविण्यात आले. निळवंडे धरणाचे काम पूर्ण करुन कालव्यांची कामे अंतिम टप्प्यात आणली आहे. ऑक्टोबर २०२२ मध्येच दुष्काळी शेतकर्यांच्या शेतात पाणी देण्याचे आपले स्वप्न होते. यासाठी रात्र दिवस कालव्यांची कामे सुरु होती. मात्र आता ही कामे थंडावली असली तरी या कामांचा पाठपुरावा करुन दुष्काळी भागाला निळवंडेचे पाणी देणे आणि गोर गरिब व सर्व सामान्यांच्या जिवनात सदैव आनंद निर्माण करण्यासाठी अविश्रांतणे काम करतच राहणार आहे. या सर्वात तीर्थरुप दादांचे विचार, तत्व आणि जिवनकार्य सदैव दिपस्तंभाप्रमाणे प्रेरणादायी आहे.

**माजी मंत्री बाळासाहेब थोरात**

पॅनल देणे आहे

सणांचा आनंद आणि बचतीची सुवर्णसंधी घेऊन येत आहे
ओम महाले अँड ग्रुप प्रस्तुत
पोपट भगीरथ महाले ज्वेलर्स!
PBM Jeweller's
अशोक चौक, चावडीजवळ, संगमनेर, जि. अ. नगर
१ तारखेपासून सुरू – फ्री GST स्कीम
होळीच्या शुभमुहूर्तावर सुरू होणारी ही खास ऑफर थेट रमजान ईदपर्यंत – संपूर्ण एक महिना!
- संपर्क - 7599996999 8265036807
लग्नकार्य, वाढदिवस किंवा खास गिफ्टसाठी हीच योग्य वेळ!
या कालावधीत सोनं, चांदी आणि आकर्षक दागिन्यांची खरेदी करा आणि मिळवा GST पूर्णपणे फ्री!
विश्वास, गुणवत्ता आणि शुद्धतेची खात्री पोपट भगीरथ महाले ज्वेलर्स!
मर्यादित कालावधीची ऑफर
आजच भेट द्या आणि बचतीचा सुवर्णयोग साधा!

पॅनल देणे आहे



नोकरीची सुवर्णसंधी
CONTACT : 98223 43319
सेल्समन ........ 05
सेल्सगर्ल........ 05
कॉम्प्युटर ऑपरेटर.... 02
हेल्पर........ 03
We are HIRING!
भंडारी क्लॉथ सेंटर
We are HIRING!
मेनरोड कॉर्नर, संगमनेर

# लिफ्ट सुरक्षेबाबत कठोर नियमांची मागणी : आ. तांबे

## संगमनेर महिला रुग्णालयाचा प्रश्न सभागृहात



युवावार्ता (प्रतिनिधी)

**संगमनेर** - आज अनेक ठिकाणी लिफ्टमध्ये लोक अडकण्याच्या घटना समोर येत असून जुन्या इमारतींमध्ये तसेच काही ठिकाणी देखभालीअभावी लिफ्ट बंद पडण्याचे प्रकार वाढत असल्याचा मुद्दा आमदार सत्यजित तांबे यांनी सभागृहात उपस्थित केला. सरकते जिने व सरकते मार्ग या संदर्भातील विधेयकावर झालेल्या चर्चेदरम्यान त्यांनी काही महत्त्वपूर्ण सूचना सभागृहासमोर मांडल्या.


या विधेयकात लिफ्टचा कालावधी २० वर्षांचा ठेवण्यात आला आहे. मात्र तंत्रज्ञान वेगाने बदलत असताना इतका मोठा कालावधी निश्चित करणे योग्य आहे का, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. ठराविक कालावधीनंतर, उदाहरणार्थ चार ते पाच वर्षांनी, लिफ्टची अनिवार्य तपासणी करून नव्याने प्रमाणपत्र देण्याची तरतूद असावी, अशी मागणीही त्यांनी केली. सध्या अनेक स्थानिक कंपन्या लिफ्ट निर्मिती करत असल्या तरी त्यांच्या दर्जावर नियंत्रण ठेवण्यासाठी स्पष्ट नियमावली असणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. लिफ्टची गुणवत्ता, देखभाल आणि सुरक्षा या बाबींवर कायद्यात अधिक कठोर तरतुदी असाव्यात, असेही त्यांनी सभागृहाचे लक्ष वेधताना सांगितले.

यावर उत्तर देताना राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांनी सांगितले की, यापूर्वी फक्त दोन विद्युत निरीक्षक आणि ७१ कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून लिफ्ट तपासणी केली जात होती. त्यामुळे अपेक्षित प्रमाणात तपासणी होत नव्हती. आता ही संख्या ५१९ अधिकाऱ्यांपर्यंत वाढवून जिल्हा स्तरावर यंत्रणा मजबूत करण्यात येत आहे. त्यामुळे लिफ्टची गुणवत्ता तपासणी आणि देखभाल अधिक प्रभावीपणे होईल, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच स्थानिक कंपन्यांच्या दर्जावर लक्ष ठेवण्यासाठीही आवश्यक सूचनांचा विचार केला जाईल, असेही त्यांनी सांगितले.

याचबरोबर ग्रामीण भागातील आरोग्य सेवेच्या प्रश्नाकडेही आमदार सत्यजित तांबे यांनी सभागृहाचे लक्ष वेधले. जागतिक आरोग्य संघटनेच्या मानकांनुसार एक हजार नागरिकांमागे एक डॉक्टर असणे अपेक्षित असताना भारतात सध्या साधारण ८५० नागरिकांमागे एक डॉक्टर उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले. आगामी काळात ही संख्या वाढण्याची शक्यता असली तरी प्रत्यक्षात ग्रामीण भागात डॉक्टर उपलब्ध होण्याची समस्या अद्याप गंभीर असल्याचे त्यांनी नमूद केले. या पार्श्वभूमीवर वैद्यकीय शिक्षण विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग आणि संबंधित यंत्रणांनी समन्वय साधून डॉक्टरांसाठी ग्रामीण भागातील इंटर्नशिप अनिवार्य करण्याबाबत धोरण ठरवावे, अशी मागणी त्यांनी सभागृहात केली. तसेच संगमनेर येथील महिला रुग्णालयाच्या प्रलंबित कामाबाबतही त्यांनी प्रश्न उपस्थित केला.

या विषयांवर मंत्रीमहोदयांनी सकारात्मक प्रतिसाद देत ग्रामीण व आदिवासी भागात सेवा देणाऱ्या डॉक्टरांना अधिक प्रोत्साहन देण्याचाही विचार सुरू असल्याचे सांगितले. संगमनेर महिला रुग्णालयासंदर्भात अधिवेशनादरम्यान बैठक घेण्याचे आश्वासनही मंत्रीमहोदयांनी दिले.

# मराठी न शिकवणाऱ्या शाळांवर होणार कठोर कारवाई - मंत्री भुसे



**मुंबई (वृत्तसंस्था)** महाराष्ट्रातील ज्या शाळांमध्ये मराठी भाषा शिकवली जात नाही, अशा संस्थांवर कठोर कारवाई केली जाणार आहे. ज्या शाळांमध्ये मराठी भाषा शिकवली जात नाही, त्यांची मान्यता रद्द केली जाईल, अशी महत्त्वपूर्ण घोषणा शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी आज विधानसभेत केली. मुंबईतील अनेक आंतरराष्ट्रीय शाळांमध्ये मराठी भाषा डावलली जात असल्याच्या मुद्दा उपस्थित झाल्यानंतर सरकारकडून ही भूमिका स्पष्ट करण्यात आली.शिवसेना ठाकरे गटाचे आमदार हारूण खान यांनी मुंबईतील इंटरनॅशनल शाळांमध्ये मराठी शिकवले जात नसल्याचे सांगितले होते. तसेच अनेक इंटरनॅशनल शाळा मराठीला केवळ तिसरी भाषा म्हणून दुय्यम स्थान देत असल्याचेही त्यांनी सांगितले होते. यावर मंत्री दादा भुसे यांनी उत्तर दिले.

राज्यातील प्रत्येक शाळेत मराठी भाषा शिकवणे बंधनकारक आहे. या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या शाळांची गय केली जाणार नाही. आगामी शैक्षणिक वर्षात अशा शाळांची पुन्हा तपासणी केली जाईल. तसेच दोषी संस्थांवर कडक कारवाई होईल, असे दादा भुसे यांनी म्हटले. यावेळी आमदार मनीषा चौधरी, योगेश सागर आणि विक्रम पाचपुते यांनी खाजगी पूर्व प्राथमिक (प्री-प्रायमरी) शाळांच्या नियमनाचा मुद्दा विधानसभेत उपस्थित केला. अनेक खाजगी प्री-प्रायमरी शाळांच्या फीवर कोणतेही नियंत्रण नसल्याचे पाहायला मिळत आहे. तसेच या शाळेत प्रवेशावेळी पालकांचे आणि मुलांचे इंटरव्ह्यू घेतले जात असल्याची बाब या आमदारांनी निदर्शनास आणून दिली. यावरही शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी माहिती दिली.आता यापुढे सर्व खाजगी पूर्व प्राथमिक शाळांना नोंदणी करणे बंधनकारक असणार आहे. आतापर्यंत १२,६३३ शाळांची नोंदणी झाली असून इतरांनाही तात्काळ आदेश दिले आहेत. येत्या शैक्षणिक वर्षापूर्वी प्री-प्रायमरी शाळांसाठी नवा अधिनियम (कायदा) लागू केला जाईल. यात वर्गांचा आकार, स्वच्छतागृहे, वाहतूक सुरक्षा आणि फी नियमन यांसारख्या बाबींचा समावेश असेल. तसेच विद्यार्थी-शिक्षक प्रमाण निश्चित करण्यात आले आहे. यानुसार प्रत्येक २० विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक असणे आता अनिवार्य असणार आहे, अशी माहिती दादा भुसे यांनी सांगितली.

या चर्चेदरम्यान सुधीर मुनगंटीवार यांनी मुलींच्या फीवरून आक्रमक पवित्रा घेतला. सामान्यांना पैसे मिळवण्यासाठी दागिने विकावे लागतात, मग एआयचा वापर करून मुलींची फी वेळेवर का दिली जात नाही? असा सवाल त्यांनी केला.

# कर्तृत्ववान महिलांचा होणार गौरव

## संगमनेरमध्ये 'स्त्रीशक्ती गौरव सन्मान सोहळा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - जगाला संस्कार, संवेदना आणि सामर्थ्य देणाऱ्या स्त्रीशक्तीचा गौरव करण्याच्या उद्देशाने जागतिक महिला दिनानिमित्त श्री यशोदेव नागरी सहकारी पतसंस्था मर्या., संगमनेर आणि साहित्य कुंज मासिक यांच्या संयुक्त विद्यमाने 'स्त्रीशक्ती गौरव सन्मान २०२६' या विशेष सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या १० कर्तृत्ववान महिलांचा या कार्यक्रमात गौरव करण्यात येणार आहे. त्यांच्या कार्याचा सन्मान करून त्यांच्या प्रेरणादायी कार्यगाथा समाजासमोर मांडण्याचा हा मनस्वी प्रयत्न आहे. हा सन्मान सोहळा शनिवार, दि. १४ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजता कृष्णा गार्डन, मेडिकव्हर हॉस्पिटल जवळ, संगमनेर येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमासाठी मा. ॲड. सौ. ज्योती मालपाणी (समुपदेशक व सामाजिक कार्यकर्त्या) आणि पद्मश्री बीजमाता राहिबाई पोपेरे (बीजसंवर्धन जननी) या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. संगमनेर शहर व परिसरातील नागरिक, महिला, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कर्तृत्ववान महिलांचा गौरव करण्यासाठी आयोजित या प्रेरणादायी सोहळ्याला उपस्थित राहावे, असे आवाहन कार्यक्रमाचे आयोजक प्रदीपभाई शाह (संस्थापक), सीए. हर्षल गुंदेचा (चेअरमन), ललितांग शाह (संचालक), अरविंद गाडेकर (संपादक), बाळासाहेब पिंगळे (उपसंपादक) आणि मनोज साकी (कार्यकारी संपादक) यांनी केले आहे.

INVOFIX
आजच सोलर सिस्टीम लावा व आपले लाईट बिल शुन्य करा
शासनामार्फत मिळणारी सबसिडी
1KW 30,000/- Rupees
2KW 60,000/- Rupees
3KW 78,000/- Rupees
सौर उर्जा आजची गरज.. उद्याची बचत..
उपलब्ध सुविधा
१. बँक लोन सुविधा उपलब्ध
२. विज बिल शुन्य करा
३. मोफत मार्गदर्शन
४. फ्री साईट व्हिजीट
५. एक्स्पर्ट टिम, क्वालिटी वर्क
PM SURYA GHAR
आजच योजनेचा लवकरात लवकर लाभ घ्या व भरघोस सबसिडी मिळवा.
Invofix Solution Pvt. Ltd., स्वागत मंगल कार्यालय समोर, अकोले बायपास रोड, संगमनेर ४२२६०५, जि. अहिल्यानगर.
7030334486 7030334494

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का? काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
※ कर्ज रक्कम वाढ । ※ कर्ज व्याजदर कमी । ※ कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु॥, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
किडनीच्या आजारांवर संगमनेरमध्ये परिपूर्ण उपचार
डायलिसीस उपलब्ध सुविधा
• 24x7 Technician
• One Time Blood Tubing Use
• Modern Dialysis Centre
• Nephrologist, AVF Surgery
• Renal Dialysis
• Dialysis Catheter Insertion
अत्याधुनिक मशिनरीद्वारे डायलिसीस
स्पेशालिस्ट - डॉ. नागेश अघोर (किडनीविकार तज्ञ) MBBS, MD, DNB, MNAMS
२४ तास सुविधांसाठी ०२४२५ - २२४७६२ ७०३८२७०३८२

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणूंची कमी गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

दर्शन टेक्सटाईल मार्केट
मान्सून ऑफर 30% ते 70% डिस्काउंट सेल
तुमच्या सौंदर्याला उठाव देणारी
सेलें नव्हे होलसेल सेल
लेडीज वेअर
संपर्क :- 8390005001 पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25